सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ८५ | मंगळवार, दि. १६ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन



श्री. डॉ. राहुल मुठे
श्री गणेश डोळ्यांचे हॉस्पीटल, अमळनेर



श्री. केतन जोशी
बजाज ऑटो, अमळनेर



श्री. वीरेंद्र (बाबा) देशमुख
स्टॅम्प वेंडर, अमळनेर



श्री. गोरख चौधरी
शिक्षक, अमळनेर

## दिनविशेष

१६ डिसेंबर

- भारतातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय पुण्यात स्थापन झाले.
- मुंबईतील ताजमहाल पॅलेस हॉटेल व्यवसायासाठी उघडले.
- भारताविरुद्धच्या युद्धात पाकिस्तानने शरणागती पत्करली.

# रंगीत बेडशीटस्‌च्या आदेशाला केराची टोपली..!

## अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभार चव्हाट्यावर...!!



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**रजनीकांत पाटील :**

अमळनेर : संक्रमणजन्य आजारांचा धोका कमी करण्यासाठी राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये दररोज वेगवेगळ्या रंगांच्या, स्वच्छ व निर्जंतुक बेडशीट्स वापरण्याचे स्पष्ट निर्देश आरोग्य विभागाने दिले आहेत. मात्र, अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील या आदेशाला केराची टोपली दाखविण्यात आली आहे. अनेक वॉर्डमध्ये जुन्या, झिजलेल्या बेडशीट्सचा वापर सुरू आहे. अनेक ठिकाणी तर बेडवर बेडशीट्सच नसल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे रुग्णांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे.

> ***“सध्या रुग्णालयात एकच रंगाच्या बेडशीट आहेत. वरिष्ठ पातळीवरून दुसरा पुरवठा अद्याप झालेला नाही. तर त्यातील काही निकामी बेडवरील बेडशीट धुण्यासाठी गेल्या असल्याने बेडवर नसतील. याबाबत कर्मचाऱ्यांना तातडीने कळवून व्यवस्था होईल.***
> ***– जी. एम. पाटील, वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय.***

आरोग्य विभागाने जाहीर केलेला ‘दररोज वेगवेगळ्या रंगांच्या बेडशीट्स’चा नियम अमळनेर ग्रामीण रुग्णालयात केवळ कागदापुरताच मर्यादित राहिल्याचा आरोप रुग्णांकडून होत आहे. स्वच्छ व निर्जंतुक चादरी मिळण्याऐवजी अनेक बेडवर जुन्या, मळका कापड अंथरलेले असल्याचे दिसते. विशेषतः शस्त्रक्रियेनंतरचे रुग्ण, महिला प्रसूती कक्ष तसेच बालरोग विभागात निष्काळजीपणा अधिक असल्याचे रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांचे म्हणणे आहे. यामुळे संसर्ग पसरण्याचा धोका वाढत असल्याची भीती व्यक्त होत आहे. रुग्णालयातील अपघात कक्षात कोणत्या दिवशी कोणत्या रंगाची बेडशीट वापरायची याबाबतचा चार्ट लावण्यात येतो. मात्र, ग्रामीण रूग्णालयात हा चार्ट कोठेच दिसून येत नाही. काही ठिकाणी बेडवरील गाद्या फाटलेल्या आहेत. त्यातील स्पंजही बाहेर आलेले आहेत. अशा अवस्थेत रुग्णांना उपचार देणे म्हणजे त्यांच्या आरोग्याशी तडजोड करण्यासारखेच असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. एकीकडे प्रशासनाकडून स्वच्छता, निर्जंतुकीकरण आणि रुग्णसुरक्षेबाबत आदेश काढले जात असताना, दुसरीकडे प्रत्यक्षात मात्र अंमलबजावणीचा अभाव स्पष्टपणे दिसून येतो. केवळ कागदी आदेशांवर समाधान न मानता रुग्णालय प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष द्यावे, नियमित स्वच्छ बेडशीट्स उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी होत आहे. यासाठी घेतला होता निर्णय एकाच बेडशीट्सचा दीर्घकाळ वापर झाल्यास त्यावर जंतू, जिवाणू, बुरशी वाढण्याचा धोका वाढतो. त्यामुळे रुग्णांमध्ये संक्रमण वाढण्याची शक्यता असते. हा धोका लक्षात घेऊन रुग्णालयातील स्वच्छतेसाठी रंगनिहाय बेडशीट वापरण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

**कुठल्या दिवशी कोणता रंग ?**

| | |
|---|---|
| सोमवार व गुरुवार | – पांढरा |
| मंगळवार व शुक्रवार | – गुलाबी |
| बुधवार, शनिवार व रविवार | – हिरवा |


अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील स्वच्छताच कोमात...!

आरोग्य केंद्रातच रुग्णांच्या आरोग्याशी उघडपणे खेळ...!!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेरच्या ग्रामीण रुग्णालयातील घाणीची एकूणच स्थिती पाहता तेथील स्वच्छताच जणू कोमात गेली आहे. ग्रामीण रुग्णालय म्हणजे खऱ्या अर्थाने आरोग्य केंद्र आहे. मात्र, याच आरोग्य केंद्रात स्वच्छतेचे तीन- तेरा वाजल्याने रुग्णांच्या आरोग्याशीच जणू उघडपणे खेळ चालू असल्याचे दूर्देवी चित्र आहे. तेथील स्थायी स्वरुपातील व मानसेवी डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या अक्षम्य दूर्लक्षाचेच हे प्रतिक आहे.

रुग्णालयाची स्वच्छता व्यवस्था पार कोलमडली आहे. स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था, तुटलेले बेड, कोरडेठाक पाण्याचे फिल्टर आणि सर्वत्र पसरलेली दुर्गंधी व घाण यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना रुग्णालयात थांबणे मुश्किल होत आहे.

रुग्णालयातील स्वच्छतागृहांची अवस्था पाहून अंगावर शहारे येतात. दुर्गंधी एवढी तीव्र आहे की, आत शिरणे म्हणजे शिक्षा भोगल्यासारखे वाटते. पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालय नाही, तर महिलांसाठी असलेलेही वापरण्यायोग्य नाहीत. पाण्याची सोय नसल्याने रुग्ण आणि नातेवाईक पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या विकत घेऊन स्वच्छतागृह वापरत आहेत. काहींना नाकातोंडाला रुमाल बांधून आत जावे लागत आहे. रुग्णालयातील जलशुद्धीकरण यंत्र देखील गेल्या अनेक दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे रुग्णांना स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी जारवर अवलंबून राहावे लागते. मात्र, जार रिकामे झाल्यास रुग्णांना बाहेरून पाणी विकत आणावे लागते. हे दृश्य एखाद्या दुर्गम गावातले नव्हे, तर तालुक्याच्या प्रमुख रुग्णालयाचे आहे, हेच सर्वाधिक धक्कादायक आहे. रुग्णालयाच्या भिंतींवर गुटख्याच्या पिचकाऱ्यांचे थरवर थर आहेत. परिसरात साचलेले कचऱ्याचे ढिगारे आणि तुटलेले बेड हे सर्व पाहता रुग्णालय हे आरोग्य केंद्र नसून ‘रोगालय’ झाल्याची चर्चा रुग्णांच्या नातेवाईकांमधून होत आहे. काही वार्डातील गाद्या फाटलेल्या, जुजबी अवस्थेत असून, त्यावर झोपणे म्हणजे शिक्षाच होय. या परिस्थितीमुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. आर्थिक परिस्थितीअभावी खासगी रुग्णालयात अनेकांना उपचार घेणे शक्य होत नाही. त्यामुळे असे गरीब रुग्ण ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी येतात. मात्र, तेथे गेल्यावर जर ॲडमिट व्हावे लागले तर मात्र आपण उगीचच येथे आलो असे त्यांना वाटते. नाईलाजास्तव बरे होईपर्यंत सर्व प्रकारची सहनशक्ती वाढवून रुग्ण व त्यांचे नातेवाईक ग्रामीण रुग्णालयात थांबतात. उच्चपदस्थ अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी एकदा का होईना, या रुग्णालयाला भेट द्यावी आणि रुग्णालयाची दूर्दशा पहावी, अशी मागणी अनेक नागरिकांनी केली आहे.

## दै. ग्लोबल महातेजने वेधले होते लक्ष....

दै. ग्लोबल महातेजने
ग्रामीण रुग्णालयाच्या भोंगळ कारभाराविषयी
मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी
प्रसिद्ध केली होती.
तसेच शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी
शवविच्छेदन गृहाची दयनीय अवस्था
या दोन्ही बातम्यांसह
ग्रामीण रुग्णालयातील अत्यंत गंभीर समस्यांना दै. ग्लोबल महातेजने वेळोवेळी वाचा फोडली आहे. मात्र, तेथील जबाबदार सुत्रांना याबाबत कोणतेही गांभीर्य नाही, हेच स्पष्ट होत आहे. आजही तेथील
**घाणीचे साम्राज्य व भोंगळ कारभार जैसे-थे आहे.**


(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील शवविच्छेदन गृहाची दयनीय अवस्था

नळाला गळती, चिखल, दुर्गंधीने आरोग्य धोक्यात!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर- ग्रामीण रुग्णालयातील शवविच्छेदन गृहाची दयनीय अवस्था झाली आहे. परिसरात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आहे. याकडे वैद्यकीय अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आहे. यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे.

मृतदेहांचे विच्छेदन करून तपासणीसाठी असलेले हे गृह प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे धोकेदायक ठरले आहे. विच्छेदन गृह विभागाच्या प्रवेशद्वाराबाहेरच असलेल्या नळास गळती लागली आहे. त्यातून रोज शेकडो लिटर पाणी वाया जात आहे. या साचलेल्या पाण्यामुळे या आवारात चिखल साचला आहे. परिणामी डासांची उत्पत्तीही वाढली आहे. यामुळे रूग्ण, मृतांचे नातेवाईक व ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचेही आरोग्य धोक्यात आले आहे. शासनाकडून विजेचा अवाजवी वापर रोखण्याबाबत जनजागृती केली जाते. मात्र, ग्रामीण रुग्णालयातील विच्छेदन गृह विभागाच्या प्रवेशद्वारावरील लाईट दिवसाढवळ्याही सुरू असतो. यामुळे विजेचा अपव्यय होत आहे. ही उधळपट्टी थांबविण्याची गरज आहे. परिसरात काटेरी झाडे- झुडपे व गवत मोठ्या प्रमाणात वाढले आहे. भींतीही कमालीच्या जीर्ण झाल्या आहेत. मुख्य गेटही तुटलेले आहे. कचऱ्याच्या वाढलेल्या ढिगाऱ्यांमुळे परिसर विद्रूप झाला आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**खा. शि. मंडळाची निवडणूक**

## तिसऱ्या दिवशी १२ उमेदवारी अर्ज

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : खानदेश शिक्षण मंडळाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या तिसऱ्या दिवशी सोमवार, दि. १५ डिसेंबर रोजी १२ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. आतापर्यंत एकूण ५३ अर्जांची विक्री झाली आहे.

अध्यक्ष पदासाठी विजय जगन्नाथ बोरसे, लालचंद हेमनदास सैनानी, राकेश गिरधरलाल माहेश्वरी व संतोष बाबूराव पाटील, उपाध्यक्ष पदासाठी सुभाष यशवंतराव पाटील, पुरूषोत्तम वसंत शेटे, विश्वस्त पदासाठी सुभाष यशवंतराव पाटील, संतोष बाबूराव पाटील, पुरूषोत्तम वसंत शेटे, कार्यकारी मंडळ सदस्य पदासाठी लीना प्रवीण पाटील, संतोष बाबूराव पाटील डॉ. रवींद्र काशिनाथ कुळकर्णी यांनी अर्ज दाखल केले आहेत.

निवडणूक उपसमितीचे चेअरमन पंडित चौधरी, सदस्य विवेकानंद भांडारकर, मनोहर महाजन, प्रा. डॉ. सुनील गरूड, खानदेश शिक्षण मंडळाचे चिटणीस प्रा. पराग पाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव, राकेश निळे, भटू चौधरी निवडणुकीचे कामकाज पाहत आहेत.

## बोहरा स्कूलमध्ये आज तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : पंचायत समिती शिक्षण विभाग व सायरादेवी बोहरा सेंट्रल स्कूलतर्फे मंगळवार, दि. १६ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता ५३वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन होणार आहे. तालुक्यातील मंगरूळ येथील सायरादेवी बोहरा स्कूलमध्ये हे प्रदर्शन होईल.

आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन होईल. खासदार स्मिताताई वाघ, स्कूलचे अध्यक्ष सुरेंद्रकुमार बोहरा, शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण, डायट प्राचार्य डॉ. अनिल झोपे, जिल्हा विज्ञान समन्वयक डॉ. चंद्रकांत साळुंखे, उपशिक्षणाधिकारी रागिणी चव्हाण, उपशिक्षणाधिकारी सचिन परदेशी, नरेंद्र चौधरी, फिरोज पठाण, एजाज शेख, प्रतिभा सानप, विजय सरोदे, माजी गटशिक्षणाधिकारी रावसाहेब पाटील, गटशिक्षणाधिकारी प्रमोद पाटील,विस्तार अधिकारी कविता सुर्वे, गटसमन्वयक रवींद्र पाटील प्रमुख पाहुणे असतील.

सकाळी ८ वाजेपासून साहित्य मांडणी करण्यात येणार आहे. प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, मुख्याधिकारी गणेश शिंदे बक्षीस वितरण कार्यक्रमास उपस्थित राहतील.

जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शन पाहण्यास उपस्थित राहावे, असे आवाहन पंचायत समिती, तालुका विज्ञान मंडळ व अमळनेर तालुका गणित मंडळाने केले आहे.

# संतश्री प्रसाद महाराजांचे अमळनेरात आगमन

## विठ्ठलनामाच्या जयघोषात भाविकांनी केले जल्लोषात स्वागत

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

संतश्री सखाराम महाराज यांचे अकरावे गादीपुरूष संतश्री प्रसाद महाराजांचे परंपरेप्रमाणे सोमवार, दि. १५ रोजी सकाळी ११ वाजता शहरात आगमन झाले. बहादरपूर रस्त्यावरील पंचमुखही हनुमान मंदिराजवळील वेशीवर वारी पोचली. यावेळी आमदार अनिलदादा पाटील यांनी संतश्री प्रसाद महाराज यांना पुष्पहार घालून स्वागत केले. विठ्ठल नामाच्या जयघोषाने परिसर दुमदुमला होता.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष विनोद लांबोळे, सौ. अनिता लांबोळे, जितेंद्र ठाकूर, माजी नगरसेवक संजय पाटील, प्रताप साळी, पंकज चौधरी, सुनील शिंपी, प्रवीण पाठक, मंगळ ग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**४२ दिवसांचा वारीचा प्रवास**

कार्तिकी पौर्णिमेला निघालेली वारी ४२ दिवसाच्या प्रवासानंतर सोमवारी सकाळी शहराच्या वेशीवर दाखल झाली. त्यानंतर वेशीवर पारंपरिक पद्धतीने संतश्री प्रसाद महाराज यांचे स्वागत भाविकांनी मोठ्या उत्साहात वाजत गाजत केले. वारी बहादरपूरमार्गे वाडी संस्थान येथे दाखल झाली. यावेळी संतश्री प्रसाद महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. विशेषतः महिला भाविकांचीही मोठी उपस्थिती होती. टाळ- मृदुंगच्या गजरातील बाल वारकऱ्यांच्या दिंडीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

दरम्यान, पंढरपूरहुन ५ नोव्हेंबरला निघालेली ही वारी भंडी शेगाव, वेळापूर, अकलूज, बारामती, जळगाव, मोरगाव, जेजुरी, सासवड, पुणे, लोहगाव, चरोली आळंदी, चाकण, पारगाव, अहमदनगर, राहुरी, बेलापूर, राहता, कोपरगाव, नांदगाव, सायगाव, मेहुणबारे, तामसवाडी, बहादरपूर असा मुक्काम करत वारी शहरात दाखल झाली. मंगळवार, दि. १६ रोजी सायंकाळी शहरातील अंबऋषी महाराज टेकडीवर काल्याच्या कीर्तनाने वारीचा समारोप होईल.

# मसाला पान



## शिवरायांच्या कपाळावरील गंध नेमके कसे होते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शिवरायांच्या कपाळावरील गंध हा इतिहासप्रेमींना चकित करणारा एक रहस्यमय विषय मानला जातो. **प्रश्न :** गंध नेमका उभा, आडवा, गोल की चंद्रकोर असा होता? यावर सतत चर्चा होत असते. **टिळा :** शिवछत्रपती कपाळावर कोणत्या प्रकारचा टिळा किंवा गंध लावत असत, याबद्दल विविध मते आहेत. **परंपरा :** हिंदू परंपरेत भगवान शिव, भगवान विष्णू, शक्ती उपासकांकडे वेगवेगळ्या प्रकारचे टिळे आणि गंध लावण्याची प्रथा दिसते. **संस्कार :** अनेक पुजारी आणि सामान्य भक्तही आपल्या दैनंदिन जीवनात कपाळावर गंध लावताना दिसतात. **कल्पना :** चित्रपट, मालिका आणि नाटकांमध्ये शिवरायांच्या कपाळावर विविध प्रकारचे टिळे दाखविले गेल्याने जनमानसात अनेक कल्पना निर्माण झाल्या. **व्हायरल:** काही भक्तांनी चंद्रकोरीच्या आकाराचा टिळा 'शिवगंध' म्हणून ओळख देत तो मोठ्या प्रमाणात प्रसारित केला.



**मूळ प्रश्न :** तथापि, खरा प्रश्न असा उरतो, की शिवराय प्रत्यक्षात गंध लावत होते की नाही? **पुरावा :** महाराजांचे एक समकालीन असे जुने चित्र त्यांच्या कपाळावरील गंधाबाबत महत्त्वपूर्ण पुरावा ठरते. **त्रिपुंड :** या चित्रात शिवरायांच्या कपाळावर तीन आडव्या शुभ्र पट्ट्यांचा त्रिपुंड गंध स्पष्ट दिसतो. **समकालीन :** जर हे चित्र १६६९ या वर्षातील असल्याचे सिद्ध झाले, तर ते महाराजांच्या हयातीतील सर्वांत पहिले रंगीत आणि समकालीन चित्र ठरेल. वडगाव मठातील जयराम स्वामीं यांच्यासोबत असलेल्या या चित्रावरून असा निष्कर्ष निघतो, की शिवराय कपाळावर त्रिपुंडाच्या स्वरूपातील शुभ्र गंध लावत असावेत.

## सक्सेस स्टोरी जिद्दीची कमाल !

# ४० व्या वर्षी दोन मुलांची आई झाली आयएएस



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

केरळच्या निसा उन्नीराजन यांनी वयाच्या ४० व्या वर्षी दोन मुलींच्या आई आणि नोकरी करत असताना ऐकण्याच्या समस्येवर मात करत सातव्या प्रयत्नात २०२४ च्या यूपीएससी परीक्षेत १००० वी रँक मिळवून आयएएस बनण्याचे स्वप्न पूर्ण केले. त्यांच्या या यशामुळे वयाची किंवा परिस्थितीची मर्यादा न ठेवता जिद्द आणि मेहनतीने कोणतेही ध्येय गाठता येते हे सिद्ध झाले आहे. निसा यांनी वयाच्या ३५ व्या वर्षी यूपीएससी परीक्षेची तयारी करण्याचा निर्णय घेतला. अनेकांसाठी ३० व्या वर्षानंतर यूपीएससीची तयारी सोडण्याची वेळ असते, पण निसा यांनी या कठीण मार्गाची निवड केली. त्या नेहमीच काहीतरी मोठे करू इच्छित होत्या.

त्यांच्या दोन लहान मुली, नंदना (११ वर्षे) आणि थानवी (७ वर्षे) यांच्या जबाबदाऱ्या, नोकरी आणि ऐकण्याची समस्या या सर्वांना सामोरे जात त्यांनी हिंमत सोडली नाही. निसा यांचे आयुष्य केवळ अभ्यासापुरते मर्यादित नव्हते. सकाळी मुलांना शाळेसाठी तयार करणे, घर सांभाळणे आणि रात्री उशिरा यूपीएससीचा अभ्यास करणे, त्यांचे वेळापत्रक थक्क करणारे होते. त्यांचे पती अरुण हे सॉफ्टवेअर इंजिनिअर आहेत. अरुण आणि त्यांच्या निवृत्त आई-वडिलांनी त्यांना पूर्ण पाठिंबा दिला. निसा म्हणतात, की "माझ्या कुटुंबाने मला प्रत्येक पावलावर साथ दिली. त्यांच्याशिवाय हे शक्य नव्हते."

**सर्वांत मोठे आव्हान**


निसा यांच्यासमोरील सर्वांत मोठे आव्हान म्हणजे त्यांची ऐकण्याची समस्या. यूपीएससीसारख्या कठीण परीक्षेच्या तयारीमध्ये ही एक मोठी अडचण ठरू शकली असती, परंतु निसा यांनी याला आपली कमजोरी बनू दिले नाही. कोट्टायमचे सब-कलेक्टर रंजीत यांच्याकडून त्यांना प्रेरणा मिळाली, जे स्वतः ऐकण्याच्या समस्येवर मात करून आयएएस बनले होते. निसा यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले, की "त्यांनी जर हे केले, तर मी का नाही?" या विचाराने त्यांना प्रत्येक वेळी अधिक बळ दिले. यूपीएससीचा प्रवास सोपा नसतो आणि निसा यांच्यासाठीही हा मार्ग काट्यांनी भरलेला होता. त्यांच्या पहिल्या ६ प्रयत्नांमध्ये त्या अयशस्वी ठरल्या. परंतु प्रत्येक अपयशानंतर त्यांनी आपल्या चुकांमधून शिकले. निसा यांचे म्हणणे आहे, की "मी कधीही विचार केला नाही की माझा कोणताही प्रयत्न वाया गेला. प्रत्येक वेळी मला काहीतरी नवीन शिकायला मिळाले."

**अखेर स्वप्न पूर्ण**

त्यांची ही जिद्द आणि मेहनत २०२४ मध्ये फळाला आली, जेव्हा त्यांनी सातव्या प्रयत्नात १००० वी रँक मिळवून आयएएस बनण्याचे स्वप्न पूर्ण केले. निसा यांनी तिरुवनंतपुरम येथील एका कोचिंग सेंटरमधून मार्गदर्शन घेतले, परंतु त्यांची खरी ताकद त्यांची अभ्यासाची अनोखी रणनीती होती. त्या यूपीएससी टॉपर्सच्या कथा आणि प्रेरणादायी व्हिडिओंमधून प्रेरणा घेत असत. त्यांनी प्रत्येक विषयाचे लहान लहान भागांमध्ये विभाजन करून अभ्यास केला आणि उजळणीवर विशेष लक्ष दिले. नोट्स काढणे आणि वेळेचे व्यवस्थापन यातील त्यांच्या कौशल्यामुळे त्यांना या कठीण परीक्षेत यश मिळाले.

# 'या' देशाच्या चलनापुढे डॉलर फेल

## एका दिनारसाठी मोजावे लागतात २४७ भारतीय रुपये



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बहरीन हा असा एक देश आहे जेथे त्यांच्या चलनाचे मूल्य एकदम मजबूत आहे. बहरीनी दिनार या बहरीन चलनाच्या आर्थिक मजबुतीमुळे जगभरात लक्ष वेधून घेते. अनेक अर्थव्यवस्थांमध्ये चढउतार होत असताना बहरीनी दिनार जगातील सर्वांत महागड्या चलनांच्या यादीत सातत्याने अव्वल स्थानावर आहे. भारतासारख्या देशातील लोकांना अनेकदा प्रश्न पडतो, की बहरीनी दिनार इतके मौल्यवान का आहे आणि तेथे काम करणाऱ्यांना कोणते फायदे मिळतात. चला तर मग या लेखात आपण याबद्दल जाणून घेऊया.

अहवालानुसार १ बहरीनी दिनार हे अंदाजे २३९ रुपयांच्या समतुल्य आहे. जर एका भारतीयाने बहरीनमध्ये १ हजार बहरीन दिनार कमावले तर भारतीय चलनानुसार त्याचे २ लाख ३९ हजार २३२ रुपये होतात. यामुळे बहरीन हा देश भारतीय कामगार, अभियंते, डॉक्टर, आयटी व्यावसायिक आणि आर्थिक तज्ज्ञांसाठी एक प्रमुख आकर्षण बनले आहे. बहरीनी दिनारची ताकद केवळ तेलाच्या उत्पन्नावर आधारित नाही तर त्याच्या स्थिर आर्थिक रचनेवर आणि पारदर्शक आर्थिक व्यवस्थेवर देखील आधारित आहे.

### बहरीनमध्ये भारतीयांची संख्या मोठी आहे.

सरकारी वेबसाइटनुसार बहरीनमध्ये अंदाजे ३ लाख २० हजार भारतीय राहतात. जे देशाच्या कामगार बाजारपेठेत महत्त्वपूर्ण योगदान देतात. हे भारतीय प्रामुख्याने बांधकाम आणि अभियांत्रिकी, बँकिंग आणि वित्त, आयटी आणि तंत्रज्ञान, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्स, शिक्षण आणि रुग्णालये आणि व्यवसाय आणि व्यवस्थापन यासारख्या क्षेत्रात काम करतात. बहरीन सरकार भारतीय समुदायाला केवळ रोजगाराच्या संधीच देत नाही तर धार्मिक आणि सांस्कृतिक स्वातंत्र्य देखील प्रदान करते. मंदिरे, गुरुद्वारा, शाळा आणि सांस्कृतिक केंद्रे येथे मुक्तपणे कार्यरत आहेत, ज्यामुळे भारतीयांना नेहमीच सांस्कृतिक संबंधाची भावना जाणवते.

### बहरीनची अर्थव्यवस्था इतकी मजबूत का आहे?

बहरीनला दीर्घकाळ तेलावर आधारित अर्थव्यवस्था मानली जात होती. परंतु काळ बदलत असताना देशाने त्यांच्या आर्थिक रचनेचे आधुनिकीकरण आणि वैविध्यपूर्णीकरण केले. आज बहरीनला आखाती प्रदेशाचे आर्थिक केंद्र मानले जाते. ज्याचे बँकिंग क्षेत्र आंतरराष्ट्रीय मानकांनुसार अत्यंत पारदर्शक आणि विश्वासार्ह आहे.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

# लिपिड प्रोफाइल म्हणजे काय?




एका प्रसिद्ध डॉक्टरांनी लिपिड प्रोफाइल खूप छान प्रकारे समजावले आणि एक सुंदर गोष्ट सांगितली. कल्पना करा, की आपले शरीर हे एक लहान गाव आहे. या गावातील सर्वांत मोठा गुन्हेगार आहे कोलेस्टेरॉल. त्याचे काही साथीदारसुद्धा आहेत. त्याचा मुख्य गुन्हेगार मित्र म्हणजे ट्रायग्लिसराइड. या सगळ्यांचे काम म्हणजे रस्त्यावरून हिंडणे, गोंधळ घालणे आणि रस्ते अडवणे. आपले हृदय हे या गावाचे मध्यवर्ती ठिकाण आहे. सगळे रस्ते हृदयाकडेच जातात. जेव्हा हे गुन्हेगार वाढायला लागतात तेव्हा काय होते याची कल्पना करा. ते हृदयाचे काम थांबविण्याचा प्रयत्न करतात. पण आपल्या शरीर गावात एक पोलीस दलसुद्धा आहे एचडीएल (गुड कोलेस्टेरॉल). हे चांगले पोलीस या गुन्हेगारांना पकडून तुरुंगात (लिव्हरमध्ये) टाकतात. मग लिव्हर त्यांना आपल्या शरीरातून बाहेर टाकतो आपल्या ड्रेनेज सिस्टिममधून. पण एक वाईट पोलीससुद्धा आहे- एलडीएल (बॅड कोलेस्टेरॉल) जो सत्तेच्या मागे लागलेला आहे. एलडीएल हे गुन्हेगार तुरुंगातून बाहेर काढतो आणि त्यांना पुन्हा रस्त्यावर सोडतो. जेव्हा चांगले पोलीस एचडीएल कमी होतात तेव्हा सगळे गाव विस्कळित होते. आशा आहे, की तुम्हाला अशा गावात राहायला आवडणार नाही. तुम्हाला हे गुन्हेगार कमी करायचे आहेत आणि चांगले पोलीस वाढवायचे आहेत का? तर चालायला लागा. प्रत्येक पावलाने एचडीएल वाढते आणि कोलेस्टेरॉल, ट्रायग्लिसराइड आणि एलडीएल कमी होतात. तुमचे शरीर (गाव) पुन्हा जीवंत होते. तुमचे हृदय गावाचे मध्यवर्ती ठिकाण हे गुन्हेगारांपासून सुरक्षित राहते (हृदयविकार टळतो) आणि जेव्हा हृदय निरोगी असेल तेव्हा तुम्हीही निरोगी राहाल. म्हणून जेव्हा-जेव्हा संधी मिळेल तेव्हा चालायला सुरूवात करा. निरोगी राहा आणि तुम्हाला उत्तम आरोग्याच्या शुभेच्छा. एचडीएल (गुड कोलेस्टेरॉल) कसे वाढवायचे आणि एलडीएल (बॅड कोलेस्टेरॉल) कसे कमी करायचे? उत्तर आहे चालणे. प्रत्येक पावलाने एचडीएल वाढते. म्हणून चालू ठेवायचे. चालत राहायचे.


## सीनिअर सिटिझन्स शुभेच्छा..!

**कमी करा** : १) मीठ, २) साखर, ३) पांढरे (refined) पीठ, ४) दुग्धजन्य पदार्थ, ५) प्रोसेस्ड फूड.
**दररोज खा** : १) भाजीपाला, २) डाळी, ३) शेंगदाणे, कडधान्य, ४) सुकामेवा, ५) कोल्ड प्रेस्ड तेल, ६) फळे.
**तीन गोष्टी विसरा** : १) आपले वय, २) आपला भूतकाळ, ३) आपली तक्रार.
**चार महत्त्वाच्या गोष्टी अंगीकारा :** १) आपले कुटुंब, २) आपले मित्र, ३) सकारात्मक विचार, ४) स्वच्छ आणि स्वागतार्ह घर.
**तीन मूलभूत गोष्टी पाळा :** १) नेहमी हसत राहा, २) तुमच्या क्षमतेनुसार नियमित व्यायाम करा, ३) वजनावर नियंत्रण ठेवा.

**सहा अत्यावश्यक जीवनशैलीच्या सवयी अंगीकारा :**
१) तहान लागेपर्यंत पाणी पिण्यास थांबू नका, २) थकल्यावरच विश्रांती घेऊ नका, ३) आजारी पडल्यावरच तपासणी करू नका, ४) चमत्काराची वाट पाहू नका, देवावर विश्वास ठेवा, ५) स्वतःवर विश्वास गमावू नका, ६) नेहमी सकारात्मक राहा आणि उज्ज्वल उद्याची आशा ठेवा. जर तुमच्या ओळखीचे ४५ ते ८० वयोगटांतील कोणी असेल, तर हा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचवा.



**गोविंदा**
**'डान्स मास्टरचा गोंधळ'**
एकदा कोरिओग्राफरने गोविंदाला सांगितले, की सर, थोडे स्लो स्टेप घ्या. गोविंदा म्हणाला, की मी स्लो झालो तर सिनेमा फ्लॉप होईल.त्याच्या जोकवर सर्व जण नाच थांबवून हसले.



**रजनीकांत**
**'एअरपोर्टचा प्रसंग'**
एअरपोर्टवर सिक्युरिटीने त्यांना विचारले, की Sir, any metallic objects? रजनीकांत म्हणाले, की फक्त माझे स्टाईलचे वजन आहे. संपूर्ण स्टाफने उभे राहून टाळ्या वाजवल्या.

# इंडियन आर्मीचे शिलेदार; कोणी ग्रुप कॅप्टन तर कोणी लेफ्टनंट कर्नल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**





भारतीय लष्करात, पोलीस दलात वरिष्ठ पदावर काही भारतीयांना मानद स्थान देण्यात आले आहे. तर काही जण थेट नोकरीच करत आहेत. कोण आहेत ते खेळाडू, तुम्हाला माहिती आहेत का?

कॅप्टन कूल एम.एस. धोनी, मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर, माजी कर्णधार कपिल देव यांच्यासह अनेक भारतीय क्रिकेटर्सला भारतीय सैन्यात आणि पोलिस दलात मानद रँकने सन्मानित करण्यात आले आहे. एम.एस. धोनी भारतीय सैन्यात लेफ्टनंट कर्नल आहे. धोनीने २०१५ मध्ये पॅराशूट रेजिमेंटमध्ये ट्रेनिंग पूर्ण केली आहे.

क्रिकेटमधील देव, मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरला सैन्य दलात मोठा हुद्दा देण्यात आला आहे. तेंडुलकरला भारतीय वायुदलात ग्रुप कॅप्टनची रँकने सन्मानित करण्यात आले आहे. क्रिकेटमधील असामान्य योगदानाबद्दल त्याला सन्मानित करण्यात आले.

भारतीय क्रिकेटला आत्मविश्वास देणारे आणि भारतात पहिला विश्वचषक आणणारे माजी कर्णधार कपिल देव यांच्याकडे सैन्य दलातील रँक आहे. त्यांना २००८ मध्ये लष्करात लेफ्टनंट कर्नल रँकने सन्मानित करण्यात आले होते.

भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज यालाही असाच सन्मान देण्यात आला आहे. त्याला लष्करात अथवा अर्धसैनिक दलात स्थान मिळाले नसले तरी तेलंगणा सरकारने त्याला पोलीस उपअधीक्षक पदाने सन्मानित केले आहे. हा त्याच्यासाठी मोठा बहुमान ठरला आहे. २००७ मध्ये टी २० विश्वचषकात शेवटच्या षटकात कमाल दाखवणाऱ्या जोगिंदर शर्मा अनेकांच्या विस्मरणात गेला असेल. पण तो देशाची सेवा करत आहे. तो हरियाणा पोलीस दलात पोलीस उपअधीक्षक पदावर कार्यरत आहे. वर्ल्डकपनंतर क्रिकेटमध्ये त्याला मोठी चमक दाखविता आली नाही. पण पोलीस दलात त्याचे नशीब चमकले.

भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर ही पंजाब पोलीस दलात पोलीस उपअधीक्षक पदावर अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. जेव्हा खेळाडू कमाल दाखवितो तेव्हा राज्य सरकार खेळाडूची एखाद्या पदावर नियुक्ती करते. महिला संघाने विश्वचषक जिंकल्यानंतर हरमनप्रीतला आता पदोन्नतीचे वेध लागले आहेत.

# थंडी म्हणजे सांधेदुखी आलीच!

## ५ नियम लक्षात ठेवा, शरीर अजिबात आखडणार नाही

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

थंडीची चाहूल लागली की अनेकांना गुडघे, खांदे, पाठीचे किंवा मनगटाचे दुखणे वाढल्याचे जाणवते. विशेषतः ज्यांना संधिवात, जुनी इजा किंवा स्नायूंच्या वेदनांचा त्रास असतो. त्यांच्यासाठी हिवाळा त्रासदायक ठरतो. या दिवसांत शरीर आखडल्यासारखे वाटते, हालचाल करणे कठीण होते आणि थोडे चालले तरी वेदना वाढतात. नेमके असे का होते आणि यावर काय करायला हवे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

हिवाळ्यात तापमान घटल्यामुळे शरीरातील रक्ताभिसरण मंदावतो : यामुळे सांध्यांपर्यंत पुरेसे रक्त पोहोचत नाही. त्यामुळे स्नायू, लिगामेंट्स आणि जोडणारे ऊतक घट्ट आणि ताठर होतात. याच अवस्थेला 'सांधे आखडणे' असे म्हणतात. थंड हवेत शरीरातील नैसर्गिक स्नेहन द्रव म्हणजेच जॉईंट फ्लूएड घट्ट होतो. त्यामुळे सांध्यांची हालचाल सुरळीत होत नाही आणि दुखणे जाणवते. परिणामी चालताना किंवा उठ-बस करताना वेदना होतात. थंड वातावरणामुळे लोक कमी हालचाल करतात, व्यायाम टाळतात. ज्यामुळे स्नायू अधिक कमकुवत होतात आणि दुखण्याची तीव्रता वाढते.

थंडीमध्ये सांधेदुखी वाढण्यामागे अनेक कारणे असतात : रक्ताभिसरण कमी होणे, स्नायू ताठ होणे, पाण्याचे प्रमाण घटणे आणि शरीरात उष्णता टिकविण्याच्या प्रयत्नात ऊर्जा खर्च होणे ही प्रमुख कारणे आहेत. काही वेळा जुन्या इजा, संधिवात किंवा हाडांतील झीज यामुळेही हिवाळ्यात वेदना वाढतात. शरीराच्या स्नायूंना आणि हाडांना पुरेसा उबदारपणा मिळाला नाही, तर हालचाल करताना प्रत्येक सांधा जणू जड वाटू लागतो. यावर उपाय म्हणून सर्वांत पहिले शरीर उबदार ठेवणे आवश्यक आहे. थंडीच्या दिवसांत गरम कपडे वापरा, विशेषतः गुडघे आणि हात झाकून ठेवा. रात्री झोपताना अंगावर चादर घ्या, पाय झाकलेले ठेवावा. सकाळी उठल्यावर हलका व्यायाम करा. चालणे, योगासने, स्ट्रेचिंग यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि स्नायू सैल होतात. गरम पाण्याने आंघोळ करणे हा सर्वांत सोपा आणि परिणामकारक उपाय आहे :

गरम पाण्यामुळे स्नायू शिथिल होतात आणि वेदना कमी होते. काहींना गरम पाण्याची पिशवी ठेवण्यानेही आराम मिळतो. मात्र सांध्यांमध्ये सूज असेल तर थंड पट्टी उपयोगी ठरते. आहारात कॅल्शियम, जीवनसत्त्व डी आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड यांचा समावेश असणारे पदार्थ घ्या. दूध, दही, तीळ, बदाम हे पदार्थ सांध्यांना बळकटी देतात. थंडीत तहान कमी लागते, पण पाणी पुरेसे पिणे विसरू नका. शरीरातील द्रव कमी झाल्यास सांध्यांतील स्नेहन द्रव घट्ट होतो आणि वेदना वाढतात.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# सावित्रीबाई फुले महिला महोत्सवानिमित्त अमळनेरात २४ डिसेंबरपासून विविध स्पर्धा

## दोन जानेवारीस उद्घाटन; ५ जानेवारीस समारोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महिला व बालकल्याण विभाग, पालिका व महिला मंच ट्रस्टतर्फे महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सावित्रीबाई फुले महिला महोत्सव जानेवारी २०२६चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. २४ डिसेंबर रोजी महोत्सवास सुरूवात होईल. सोमवार, दि. ५ जानेवारी २०२६ रोजी दुपारी महोत्सवाचा समारोप होईल. या महोत्सवात विविध स्पर्धा होणार आहेत. महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

**महोत्सवाची रूपरेषा अशी**

बुधवार, दि. २४ डिसेंबर ते रविवार, दि. २८ डिसेंबरपर्यंत घरगुती, गच्चीवरील परसबाग स्पर्धा होतील. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सौ. काचन शहा (९४२१०१३००९) व प्रा. डॉ. रंजना देशमुख (९४२२७१६९५०) यांच्याशी संपर्क साधावा. गुरुवार, दि. २५ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता जिजाऊ महिला जीम येथे पोत्यात पाय ठेवून चालणे स्पर्धा होईल. या स्पर्धेसाठी सौ. सरोज भांडारकर (८२०८२१५२६५), सौ. उज्वला शिरोडे (८६६९०४६४९४) व सौ. सुलोचना वाघ (९४२३९३४९६३) यांच्याशी संपर्क साधावा. शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता जिजाऊ महिला जीम येथे गीता वाचन स्पर्धा होईल. या स्पर्धेसाठी डॉ. अपर्णा मुठे (९४२२२११२७४), सौ. उमा अग्रवाल (९४०३५६८११७) व सौ. सविता पाटील (८४२११७६६१०) यांच्याशी संपर्क साधावा. शनिवार, दि. २७ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता जिजाऊ महिला जीम येथे फळ- भाज्यांपासून पाककृती स्पर्धा होईल. यासाठी सौ. सरोज भांडारकर

**स्पर्धांचे नियम**

**सर्व स्पर्धांसाठी कमीत कमी १० स्पर्धक असलतील तरच स्पर्धा घेण्यात येईल. ज्या महिलांना वॉकेथॉन स्पर्धेत कधीही पहिले ३ क्रमांक मिळाले असतील, त्यांना या स्पर्धेत सहभागी होता येईल. मात्र, त्या बक्षीसपात्र राहणार नाहीत. सर्व कार्यक्रमांसाठी प्रवेश मोफत**

३० डिसेंबर रोजी अमळनेर पोलीस ठाण्यातर्फे भद्रा प्रतिक मॉल येथे सकाळी ७ वाजता वॉकेथॉन स्पर्धा होईल. (फक्त विवाहित महिलांसाठी) यासाठी सौ. तिलोत्तमा पाटील (९४२३३६७१११), डॉ. मंजुश्री जैन (९२२५४७१००८) व सौ. उज्वला शिरोडे (८६६९०४६४९४) यांच्याशी संपर्क साधावा. गुरुवार, दि. ३१ डिसेंबर रोजी अमळनेर पोलीस ठाण्यातर्फे भद्रा प्रतिक मॉल येथे सकाळी ७ वाजता मॅरेथॉन स्पर्धा होईल. (२० वर्षांवरील सर्व महिलांसाठी व मुलींसाठी) यासाठी सौ. तिलोत्तमा पाटील (९४२३३६७५११), सौ. पद्मजा पाटील (७०३८४४२२२१) व सौ. वैशाली शेवाळे (९५२९५७०६२४) यांच्याशी संपर्क साधावा. शुक्रवार, दि. २ जानेवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात सकाळी ९ ते ११ पोस्टर रांगोळी स्पर्धा व महिला महोत्सवाचे उद्घाटन होईल. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते खाऊ गल्ली व स्टॉलचे उद्घाटन होईल. मुंबई येथील उद्योजिका रुचीरा सुराणा प्रमुख पाहुण्या असतील. दुपारी साडेतीन वाजता महिला व उद्योग या विषयावर व्याख्यान हाईल. यासाठी नयना कुळकर्णी (८८३०६४४४२९), सौ. उज्वला शिरोडे (८६६९०४६४९४), श्रीमती भारती गाला (९४२३९०३१९९) व सौ. विजया देसर्डा (९४२०६५२६५४) यांच्याशी संपर्क साधावा. शनिवार, दि. ३ जानेवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात दुपारी ४ वाजता नाट्यप्रवेश स्पर्धा होईल. यासाठी डॉ. अपर्णा मुठे (९४२२२११२७४), प्रा. शिला पाटील (९४२२४०९९५९) व सौ. वसुंधरा लांडगे (९६८९०३७८४१) यांच्याशी संपर्क साधावा. रविवार, दि. ४ जानेवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात दुपारी ३ वाजता एकल समुह नृत्य स्पर्धा होईल. यासाठी सौ. करुणा सोनार (८०८०१२७४६८), श्रीमती माधुरी पाटील (७८७५५२२४६६) व डॉ. मंजुश्री जैन (९२२५४७१००८) यांच्याशी संपर्क साधावा. सोमवार, दि. ५ जोनवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात दुपारी साडेतीन वाजता जाहिरात सादरीकरण स्पर्धा, प्रमुख पाहुण्यांचे स्वागत, मनोगते होतील. सौ. रंजना पवार गवांदे प्रमुख पाहुण्या असतील. महिला आणि अंधश्रद्धा यावर व्याख्यान होईल. मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरणाने महोत्सवाचा समारोप होईल. यासाठी सौ. विद्या हजारे (९८६०३१०९२०, ९१५६४६५५२३) व सौ. कांचन शहा (९४२१०१३००९) यांच्याशी संपर्क साधावा.

महोत्सवाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महिला मंच ट्रस्टच्या अध्यक्षा डॉ. अपर्णा मुठे, नवनिर्वाचित नगराध्यक्ष, मुख्याधिकारी गणेश शिंदे, उपाध्यक्षा सौ. तिलोत्तमा पाटील, सचिव सौ. सरोज भांडारकर, कोशाध्यक्षा कांचन शहा यांनी केले आहे.


**महसूल विभागाचा मोठा निर्णय!**

# वडिलोपार्जित जमिनीची वाटणी अल्प खर्चात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यातील लाखो कुटुंबांसाठी दिलासादायक ठरणारा निर्णय महसूल विभागाकडून जाहीर करण्यात आला आहे. वडिलोपार्जित जमीन किंवा जागेची मुला-मुलींमध्ये वाटणी आता अत्यल्प खर्चात करता येणार आहे. केवळ ५०० रुपयांच्या स्टॅम्पवर ही प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

या निर्णयामुळे नागरिकांना पाच हजारांपासून तब्बल ३० हजार रुपयांपर्यंतची थेट आर्थिक बचत होणार आहे. जमीन वाटप प्रक्रियेला मोठी गती मिळण्याची शक्यता आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संदर्भात विधान करत ही सवलत जाहीर केली आहे. मात्र, या निर्णयाबाबतचा अधिकृत शासन निर्णय (जीआर) अद्याप जारी झालेला नाही. शासन निर्णय जाहीर झाल्यानंतर प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होईल, असे महसूल विभागाने स्पष्ट केले आहे. सध्या महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ८५नुसार संयुक्त धारणा असलेल्या जमिनीत एकापेक्षा अधिक सहधारक असल्यास, प्रत्येकाला आपल्या हिश्श्याच्या वाटणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करता येतो.



या प्रक्रियेसाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही आणि तहसीलदारांमार्फत वाटणीची कार्यवाही केली जाते. मात्र, जर संबंधित जमिनीसंदर्भात मालकी हक्कावर वाद असेल तर दिवाणी न्यायालयाचा निकाल होईपर्यंत वाटणी प्रक्रिया थांबविली जाते. जर वडील हे संमतीने मुला-मुलींमध्ये जमीन किंवा जागेची वाटणी करत असतील, तर सध्याच्या व्यवस्थेनुसार त्यासाठी स्टॅम्प ड्यूटी, नोंदणी शुल्क आणि अतिरिक्त कागदोपत्री खर्च करावा लागतो. जमिनीसाठी साधारण एक ते दोन टक्के स्टॅम्प ड्यूटी आणि नोंदणी फी द्यावी लागते.

तर जागेच्या वाटणीसाठी दोन टक्के स्टॅम्प ड्यूटी आणि एक टक्का नोंदणी फी आकारली जाते. यामुळे अनेक नागरिकांवर आर्थिक भार पडत होता. नवीन प्रस्तावित निर्णय काय? प्रस्तावित नव्या निर्णयामुळे ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सुलभ होणार आहे. सर्व वारसांची लेखी संमती आणि वाटप होणाऱ्या क्षेत्राची स्पष्ट माहिती असलेला फक्त ५०० रुपयांचा स्टॅम्प दुय्यम निबंधक कार्यालयात सादर केल्यानंतर संबंधित जमिनीचे किंवा जागेचे हिस्से थेट मुला-मुलींच्या नावे नोंदविले जातील. विशेष म्हणजे, यासाठी अतिरिक्त स्टॅम्प ड्यूटी किंवा नोंदणी शुल्क भरावे लागणार नाही.

महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मते, या निर्णयामुळे घरगुती पातळीवर होणारे मालमत्तेचे वाद कमी होण्यास मदत होईल. तसेच, वडिलोपार्जित संपत्तीच्या वाटपासाठी वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली प्रकरणे जलदगतीने निकाली लागू शकतील. मुद्रांक शुल्क अधिकाऱ्यांनी यासंदर्भात स्पष्ट केले आहे, की सध्या लागू असलेल्या नियमांमध्ये बदल होणार आहे. त्याबाबतचा शासन निर्णय जाहीर झाल्यानंतरच प्रत्यक्ष कार्यवाही करता येईल. नागरिकांनी अधिकृत जीआर येईपर्यंत जुने नियमच अनुसरावेत, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

ग्लोबल महातेजचा अंक बुक करण्यासाठी संपर्क :
8788441234



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

**ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत.** खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# पन्नास वर्षांनी पुन्हा रिलीज होताच 'शोले'ने पहिल्या दिवशी कमावले 'इतके' लाख

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'शोले' या आयकॉनिक चित्रपटाचे लाखो चाहते आहेत. ५० वर्षांपूर्वीचा हा चित्रपट आजही टीव्हीवर मोठ्या उत्साहाने प्रेक्षक पाहत असतात. या चित्रपटातील वीरू अर्थात धर्मेंद्र यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर 'शोले' पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर रिलीज करण्यात आला आहे. रिलीजनंतर या सिनेमाने किती कमाई केली, ते जाणून घेऊयात. 'शोले' ४के अल्ट्रा हाय डेफिनिशन (यूएचडी) क्वालिटीमध्ये रिस्टोर केला आहे. ५० वर्षे जुना चित्रपट आता अत्यंत क्लियर व चांगल्या पिक्चर क्वालिटीसह प्रेक्षक पाहू शकतात. धर्मेंद्र आणि अमिताभ बच्चन यांचा क्लासिक कल्ट चित्रपट 'शोले'ची पहिल्या दिवसाची कमाई लाखांमध्ये आहे.

धर्मेंद्र आणि अमिताभ बच्चन यांचा 'शोले' हा चित्रपट शुक्रवारी पुन्हा प्रदर्शित झाला. या सिनेमात चाहत्यांना दिवंगत




धर्मेंद्र यांना मोठ्या पडद्यावर पाहता आले. धर्मेंद्र यांच्या निधनानंतर हा सिनेमा रिलीज झाल्याने त्याबद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुकता होती. रमेश सिप्पी दिग्दर्शित धर्मेंद्र आणि हेमा मालिनी यांचा 'शोले' हा चित्रपट शुक्रवारी ४के व्हर्जनमध्ये पुन्हा प्रदर्शित झाला. रिपोर्टनुसार, 'शोलेः द फायनल कट'ने पहिल्या दिवशी ३० लाख रुपये कमावले आहेत.

**बऱ्याच बदलांसह रिलीज झाला 'शोले'**

'शोले' बऱ्याच बदलांसह पुन्हा रिलीज करण्यात आला. जय-वीरूच्या जोडीने प्रेक्षकांना पुन्हा एकदा खळखळून हसवले. ५० वर्षांपूर्वी पुन्हा मोठ्या पडद्यावर शोले पुन्हा रिलीज झाला. त्यामुळे प्रेक्षकांच्या आठवणींना उजाळा मिळाला आहे.

**'किस किसको प्यार करूं २'चे कलेक्शन**

नुकताच प्रदर्शित झालेला रणवीर सिंग आणि अक्षय खन्नाचा 'धुरंधर' चित्रपट थिएटरमध्ये चांगली कमाई करतोय. याच दरम्यान या शुक्रवारी आणखी काही चित्रपट प्रदर्शित झाले. कपिल शर्माचा विनोदी चित्रपट 'किस किसको प्यार करूं२' हा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. हा चित्रपट कपिलच्या बहुचर्चित 'किस किस की प्यार करूं' चा सिक्वेल आहे. मात्र, हा चित्रपट प्रेक्षकांना फारसा आवडला नाही. सॅकनिल्कच्या अहवालानुसार, 'किस किसको प्यार करूं २' ने पहिल्या दिवशी फक्त १. ७५ कोटींची कमाई केली. मात्र, चित्रपटाचे जगभरातील कलेक्शन अद्याप कळू शकलेले नाही.

# जळगावहून पुण्याला एक्स्प्रेस हायवेने फक्त तीन तासांत पोहोचता येणार...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पुणे- छत्रपती संभाजीनगर शहरांना जोडणारा अत्याधुनिक, एक्स्प्रेस हायवे (उच्चगती महामार्ग) उभारण्याची घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांनी केली आहे. प्रस्तावित महामार्ग पूर्ण झाल्यानंतर जळगावहून पुण्याला केवळ तीन तासात पोहोचता येणार असल्याने जिल्ह्याच्या विकासाला नवे पंख लाभणार आहेत. सध्या पुण्याहून छत्रपती संभाजीनगर येथे पोहोचण्यासाठी सहा ते साडेसहा तासांचा कालावधी लागतो. मात्र, प्रस्तावित उच्चगती महामार्ग पूर्णत्वास आल्यानंतर पुणे- छत्रपती संभाजीनगर अंतर अवघ्या दोन तासात पार करता येईल, असा दावा केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांनी केला आहे.

दुसरीकडे, नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गाला जळगाव जोडण्याचा महत्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या उपस्थितीत नागपूरमध्ये



जून महिन्यात झाला आहे. जळगाव ते छत्रपती संभाजीनगर दरम्यानच्या प्रवासाला गती देतानाच, जळगावहून मुंबई आणि पुण्याला कमी वेळेत कसे पोहोचता येईल, यादृष्टीनेही नागपूरमधील बैठकीत चर्चा झाली होती. त्यानुसार, सद्यःस्थितीत जळगावहून अजिंठा, सिल्लोडमार्गे छत्रपती संभाजीनगरला पोहोचण्यासाठी अडीच तासांची कालावधी लागतो. हा रस्ता समृद्धी महामार्गाशी जोडण्यापूर्वी जळगाव ते छत्रपती संभाजीनगर दरम्यानचा प्रवास अवघ्या एक तासावर आणण्याचे ठरले आहे. जळगाव-छत्रपती संभाजीनगर दरम्यानचा प्रवास एक तास आणि पुढे छत्रपती संभाजीनगर ते पुणे उच्चगती महामार्गावरील प्रवासाचे दोन तास गृहीत धरले तर केवळ तीन तासांत जळगावहून पुण्याला पोहोचणे त्यामुळे शक्य होणार आहे.

पुणे-छत्रपती संभाजीनगर उच्चगती महामार्गासाठी सुमारे १६ हजार ३१८ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हा महामार्ग अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उभारण्यात येणार असून, त्यामध्ये उच्च दर्जाचे रस्ते, आधुनिक पूल, उड्डाणपूल, सेवा रस्ते तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या प्रकल्पामुळे केवळ दळणवळण सुलभ होणार नाही, तर महाराष्ट्राच्या औद्योगिक, व्यापारी आणि सामाजिक विकासालाही मोठी चालना मिळणार आहे. पुणे हे आयटी, शिक्षण आणि औद्योगिक केंद्र असून छत्रपती संभाजीनगर हा पर्यटन, औद्योगिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा भाग आहे. या दोन्ही शहरांमधील थेट आणि जलद संपर्कामुळे उद्योग, व्यापार, पर्यटन तसेच रोजगाराच्या संधी वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यासोबतच जळगाव पर्यायाने खान्देशच्या विकासालाही गती मिळण्याची आशा व्यक्त होत आहे.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले
महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.

